Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १६८ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१८ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# घाबरू नका, संविधान बदलण्याची धमक भाजपामध्ये नाही, राहुल गांधींनी ठणकावले

**मुंबई (वृत्तसंस्था)**–कन्याकुमारी ते काश्मीर ४ हजार किलोमीटरची पदयात्रा केल्यामुळे हिंदुस्थान जवळून पाहण्याची संधी मिळाली. मी जो हिंदुस्थान समजत होता त्यापेक्षा तो वेगळा असल्याचे या यात्रेतून समजले. भारत जोडो यात्रेतून लोकांशी संवाद साधल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे दिसले त्यामुळे दुसऱ्या यात्रेत न्याय हा शब्द जोडला. या यात्रेतून पाच घटकांना गॅरंटी देण्यात आल्या. ही गॅरंटी काँग्रेस पक्ष, मल्लिकार्जून खरगे वा राहुल गांधीची नाही तर तो हिंदुस्थानचा आवाज आहे, जनतेची मते विचारात घेऊन गॅरंटी दिलेली आहे, असे खासदार राहुल गांधी यांनी स्पष्ट केले. भाजपा सत्तेत येईल व संविधान बदलेल असे काही होणार नाही, भाजपा असे काहीही करू शकत नाहीत आणि त्यांच्यात तेवढी धमकही नाही पण सत्य व हिंदुस्थान आपल्याबाजूने आहे, असेही राहुल गांधी यावेळी म्हणाले.

राहुल गांधी यांनी सांगितले की, भारत जोडो यात्रेत केवळ राहुल गांधी चालला नाही तर हिंदुस्थानातील कोट्यवधी लोक पायी चालले, कोट्यवधी लोकांची जी भावना आहे त्यातील मी एक आहे. या यात्रेची शक्ती देशातील जनता आहे आणि ही लढाई आपल्याला एकत्र लढायची आहे. मोदी–राहुल, भाजपा–काँग्रेस यांच्यातील ही लढाई नाही तर देशाच्या स्वभावातील दोन आत्म्यांमधील ही लढाई आहे. एक आत्मा म्हणतो हिंदुस्थान मध्यातून चालवावा, वरून आदेश देऊन चालवावा आणि दुसरा म्हणतो विकेंद्रीकरण करून सर्वांची मते विचारात घेऊन चालवला पाहिजे. घाबरू नका, भाजपा सत्तेत येईल व संविधान बदलेल असे काही होणार नाही, भाजपा असे काहीही करू शकत नाहीत आणि त्यांच्यात तेवढी धमकही नाही पण सत्य व हिंदुस्थान आपल्याबाजूने आहे, असेही राहुल गांधी म्हणाले. मुंबईत आयोजित न्याय संकल्प सभेत खासदार राहुल गांधी बोलत होते, ते पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्षाने जनतेला विचारून, सर्वांची मते विचारात घेऊन या गॅरंटी दिल्या आहेत. भारतीय जनता पक्ष हे करु शकत नाही कारण त्यांच्याकडे सर्वकाही वरून येते.



भाजपात केंद्रीकृत पद्धत आहे. सर्व काही नरेंद्र मोदी सांगतात तसेच चालते.आरएसएस व त्यांच्या मते ज्ञान एकाच व्यक्तीजवळ आहे, कामगार, शेतकरी यांना काहीच समजत नाही. बेरोजगाराला काही माहितीच नाही, असे ते समजतात. देशातील सर्वात विद्वान शास्त्रज्ञानाजवळ जेवढे ज्ञान आहे तेवढेच ज्ञान शेतकऱ्याजवळ आहे. बीडी कामगार महिलांच्या हातात जे कौशल्य आहे त्याचा आदर केला जात नाही, त्यांना पाठिंबा देणे गरजेचे आहे, आर्थिक मदत करा, मग बघा किती फरक पडतो, त्यांच्या हातातून मेक इन इंडिया घडतो. हिंदुस्थान द्वेषाचा देश नाही तर प्रेमाचा देश आहे. भारतीयांच्या डीएनएमध्येच आदर, प्रेम भरपूर आहे. हिंदुस्थान हा जगातील पहिला देश आहे ज्याने स्वातंत्र्याची लढाई प्रेमाने लढली. दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्याची प्रेरणा भारताकडून मिळाली, गांधीजींचे तत्वज्ञान व दिशा मिळाली त्यातूनच दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्य मिळाले.हिंदुस्तान प्रेमाचा देश आहे तर त्यात द्वेष का परवला जातो? तर या द्वेषाचे कारण अन्याय आहे. गरिब, शेतकरी, दलित, महिला, तरुण या घटकांवर अन्याय होत आहे. देशातील केवळ दोन तीन टक्के लोकांना न्याय मिळतो, त्यांच्यासाठी न्यायपालिका काम करतात, सरकार काम करते, सर्व संस्थांमध्ये त्यांना स्थान आहे पण ९० टक्के लोकांवर सातत्याने अन्याय होत आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय निघाला तेव्हा असे सांगितले गेले की, कर्जमाफीमुळे शेतकरी आळशी बनेल, त्याची सवय बिघडले मग २०–२२ लोकांचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले तर त्यांची सवय बदलत नाही का? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला. गरिब, आदिवासी, मागास, वंचित, शेतकऱ्यांकडून पैसे वसूल करुन २०–२२ धनदांडग्यांची घरे भरली जात आहेत.खासदार राहुल गांधी यांनी सकाळी मणिभवनला भेट देऊन महात्मा गांधी यांना आदरांजली पाहिली त्यानंतर ऑगस्ट क्रांती मैदानापर्यंत न्याय संकल्प पदयात्रा काढली, या यात्रेत राहुल गांधी यांच्यासोबत महासचिव प्रियंका गांधी, महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी, अभिनेत्री स्वरा भास्कर यांच्यासह सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. पदयात्रेनंतर न्याय संकल्प सभा आयोजित करण्यात आली होती.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात हातभट्टी दारूसाठा नष्ट

## स्थानिक गुन्हे शाखा व भद्रावती पोलिसांची संयुक्त कारवाई

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती, वाहतूक व विक्रीवर आळा घालण्याकरिता चंद्रपूर पोलिस दलाने धडक मोहीम हाती घेतली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात हातभट्टी तसेच अवैध दारू निर्मिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार केले असून या पथकाने १७ मार्च रोजी मोठ्या प्रमाणात हातभट्टी व दारू साठा नष्ट केला.भद्रावती पोलिस स्टेशन अंतर्गत बरांज तांडा येथे एक इसम हातभट्टी लावून अवैधरित्या दारू काढत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळाली. त्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तसेच भद्रावती पोलिस स्टेशन येथील पथक बरांज तांडा येथे पोहचले. यावेळी शोध घेतला असता एक महिला तिच्या घराच्यामागे हातभट्टी लावून गुळ मिश्रित दारू गळताना आढळली. सदर घराची कायदेशीररित्या झडती घेतली असता



घरामध्ये गुळ, दारू व तीन प्लास्टिक कॅन मध्ये १५ लिटर शरीरास अपायकारक व नाशकारक द्रव्यमिश्रित पदार्थापासून तयार केलेली हातभट्टी गुळांबा दारू आढळून आली. तसेच घराच्या समोर झुडपी जंगलात व नाल्यात जमिनीत गाडलेल्या खड्ड्यांमध्ये बारा प्लास्टिक ड्रम मध्ये दारू सडवा किंमत ९० हजार रुपये तसेच मोठे स्टीलचे गुंड व इतर साहित्य असे एकूण ९७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. या संदर्भात आरोपी सुनीता राजेंद्र पाटील (वय ३५) हिच्याविरुद्ध भद्रावती पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदवण्यात आला असून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

सदर कामगिरी जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन तसेच अपर पोलिस अधीक्षक रीना जनबंधू यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक महेश कोंडावार, भद्रावतीचे पोलिस निरीक्षक विपिन इंगळे यांच्या नेतृत्वात हर्षल एकरे, मनोज गदादे, विनोद भूरले, धनराज करकाडे, स्वामीनाथ चालेकर, संजय आतकुलवार, सुरेंद्र मोहतो, गजानन नागरे, अनुप डांगे व इतर अधिकारी व कर्मचा–यांनी पार पाडली.

# आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे विभाग प्रमुखांना निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक हा कालबध्द कार्यक्रम असून चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक पहिल्याच टप्प्यात आहे. त्यामुळे प्रत्येकाने निवडणुकीचे गांभिर्य लक्षात घेऊन आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले.



नियोजन भवन येथे निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर आयोजित विभाग प्रमुखांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, सहाय्यक जिल्हाधिकारी रंजित यादव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार आदी उपस्थित होते.निवडणुकीच्या वेळी कोणताही हलगर्जीपणा चालणार नाही, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, प्रत्येकाने निवडणुकीचे गांभिर्य जाणावे व आपापली जबाबदारी काटेकारपणे पार पाडावी. निवडणूक हा कालबध्द कार्यक्रम असतो. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्याच टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी पार पडणार आहे. त्यामुळे आपल्याकडे फक्त १ महिना असून सर्व कामे अतिशय सुक्ष्म नियोजन करून पार पाडणे अपेक्षित आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे वाचन करून त्यानुसारच त्याची अंमलबजावणी करावी. तसेच निवडणुकीच्या कालावधीत परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे निर्देशही जिल्हाधिका–यांनी दिले.यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी यांनी आदर्श आचारसंहितेबाबत सादरीकरण केले. बैठकीला विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# पडोस युवा संसदेसाठी एक दिवसाचे पंतप्रधान करिता वैभव ठाकरे यांची निवड

**चिमूर । प्रतिनिधी**

नेहरू युवा केंद्राच्या माध्यमातून प्रतिरूप संसद भवनात एक दिवसाचा पंतप्रधान बनण्याचा योग चिमूर तालुक्यातील आंबोली या गावचे उपसरपंच वैभव ठाकरे यांना मिळाला.

नेहरू युवा केंद्राने प्रतीरूप संसदेसाठी ऑनलाईन अर्ज मागितले होते. त्याकरिता पंतप्रधान बनण्यासाठी ९० युवकांनी अर्ज सादर केले. त्या अर्जासोबत आपण गावामध्ये केलेले समाजकार्य विकास कार्य शैक्षणिक कार्य याबाबतची माहिती पावती द्वारे जोडायची होती. त्या अनुषंगाने या सर्वांची छाननी होऊन अठरा लोकांची निवड करण्यात आली. आणि या आठरा युवकांमधून पंतप्रधान सभापती विरोधी पक्षनेते आणि मंत्रिमंडळ यासाठी फॉर्म भरल्या गेले आणि या सर्वांनी ऑनलाइन मतदान करून आंबोलीचे उपसरपंच वैभव ठाकरे यांना सर्वात जास्त त्रेपन्न टक्के मते मिळून एक दिवसाच्या पंतप्रधानपदी निवड करण्यात आली. या प्रतिरूप संसदेचे अधिवेशन १६ मार्च २०२४ ला नेहरू युवा केंद्राच्या माध्यमातून राजीव गांधी इंजीनियरिंग कॉलेज चंद्रपूर येथे घेण्यात आले. यातून या युवकांना नेतृत्व गुण मिळावे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढावा,



समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळावी, आणि प्रारूप संसद कशी चालते, निर्णय कसे घेतले जातात, मंत्रिमंडळाचे कार्य कोणते, अर्थसंकल्प कसा सादर करायचा, या सर्व विषयांचा अभ्यास करून पडोस युवा संसदेत अनुभव घेता आला. आणि युवकांना यातून संसदेच्या कामकाजाविषयी माहिती होऊन भारताची लोकशाही सक्षम होण्यास कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

आम्ही सुद्धा ग्राम पंचायत आंबोलीला एक दिवसाचा सरपंच उपक्रम राबविला होता. जेणेकरून गावातील विद्यार्थ्यांना ग्राम पंचायत कळेल. हा उदात्त्य हेतू होता. आणि मला एक दिवसासाठी का असेना एक दिवसाच्या पंतप्रधान बनवण्याची संधी मिळाल्याने मी स्वतःला खूप भाग्यशाली समजतो.
**वैभव ठाकरे,उपसरपंच ग्रा.प.आंबोली**

# पोलीस सांगून शेतकऱ्याला लुटले

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगावहुन चिंचोली येथे जाणाऱ्या शेतकरी अरुण पंपालिया यांना अडवून पोलिस असल्याचे सांगून त्यांच्याजवळील अंगठ्या फसवणूक करून भामट्यानी पळविल्याची घटना दि.१७ ला येथे घडली.

चिंचोली येथील मुळ रहिवाशी असलेले अरुण पंपालिया पुलगावहुन चिंचोलीला शेती व पारिवारिक कामासाठी जात असतात. आज दि.१७ ला येथील श्री राम मंदिर जवळ आम्ही एलसीबी पोलीस आहेत असा धाक दाखवून दोन मोटारसायकल असलेल्या व्यक्तींनी अरुण पंपालिया यांना अंगठ्या हातातून काढायला लावल्या.अरुण पंपालिया



अंगठ्या खिशात घालत होते. तेव्हा दोन तरुणांनी त्यांना भिती दाखवून त्या अंगठ्या आम्ही कागदामध्ये बांधून देतो, असे आश्वासन देऊन त्यांनी अरुण पनपालिया (वय ६५) यांच्याकडून घेतल्या व कागदात बांधून त्यांच्या हातात ती पुडी दिली. काही वेळानंतर पाहिले असता त्या पुडीमध्ये एक छोटा दगड बांधून असलेला आढळून आला. हा प्रकार एक प्रकारचे संमोहन असू शकतो. यावर पोलीस प्रशासनाने जागरूक राहून अशा या भामट्या चोरावर योग्य ती कारवाई करावी,अशी अपेक्षा आहे. या प्रकारची घटना पुलगाव मधे वारंवार होत असल्याने पुलगाव पोलीस काय करत आहे?असा प्रश्न लोकांमध्ये उपस्थित होत आहे. या घटनेचा तपास पुलगाव पोलिस करत आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरकार्यवाह दायित्वावर दत्तात्रेय होसबळे यांची पुढील तीन वर्षांसाठी एकमताने निवड

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दत्तात्रेय होसबळे यांचा जन्म १९५४ मध्ये कर्नाटकातील शिमोगा जिल्ह्यातील होसबळे गावात झाला. बंगलोर विद्यापीठातून इंग्रजीमध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. दत्तात्रेय होसबळे १९६८ मध्ये वयाच्या १३ व्या वर्षी संघाचे स्वयंसेवक झाले. आणि १९७२ मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत सामील झाले. १९७८ मध्ये पदव्युत्तर पदवी पूर्ण केल्यानंतर ते संघाचे प्रचारक बनले. विद्यार्थी परिषदेत प्रांतीय, प्रादेशिक आणि अखिल भारतीय स्तरावर विविध दायित्व पार पाडल्यानंतर, १९९२ ते २००३ अशी ११ वर्षे अ. भा. संघटनेचे मंत्री होते.२००३ मध्ये ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सह–बौद्धिक प्रमुख बनले. २००९ ते २०२१ या कालावधीत सह सरकार्यवाह पदावर कार्यरत होते. २०२१ पासून ते संघाच्या सरकार्यवाह पदाची दायित्व सांभाळत आहेत.दत्तात्रेय होसबळे यांना त्यांची मातृभाषा कन्नड व्यतिरिक्त इंग्रजी, तमिळ, मराठी, हिंदी आणि संस्कृतसह



अनेक भाषांचे ज्ञान आहे. ते असिमा या कन्नड मासिकाचे संस्थापक संपादकही होते. १९७५–७७ च्या आणीबाणीच्या काळात त्यांनी चळवळीत सक्रिय भूमिका बजावली आणि सुमारे १४ महिने 'मिसा' अंतर्गत तुरुंगात राहिले.ते विश्व विद्यार्थी युवा संघटना चे संस्थापक सरचिटणीस होते, भारतात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांची संघटना. तुम्ही अमेरिका आणि युरोपसह जगातील अनेक देशांना भेट दिली आहे.


# प्रहार जनशक्ती पक्ष वरोरा तालुका पदी अमोल काटकर यांची निवड



**वरोरा । प्रतिनिधी**

प्रहार जनशक्ती पक्षा चे अध्यक्ष दिव्यांग कल्याण मंत्रालयीन अध्यक्ष आ.बच्चू कडू यांच्या उपस्तिथिती विदर्भातील जिल्हा प्रमुखांची बैठक नागपूर येथे आयोजित केली होती. त्यात वरोरा तालुका प्रमुख पदी अमोल काटकर यांची तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली. या निवडी दरम्यान चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष शेरखान पठाण, प्रहार सेवक अमित बहादुरे आणी सर्व जिल्हा प्रमुख उपस्तिथ होते. लोकसभेच्या आचार संहिता लागल्यावर ही निवड अनेकाचे लक्ष वेधून घेत आहे. तालुक्यातून या निवडी साठी अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

# शहाजींची स्वराज्य संकल्पभूमी-शहागड!



**शहाजीराजे भोसले हे पराक्रम, युद्धप्रसंगीची बुद्धिमत्ता, उत्तम प्रशासन व स्वतंत्र राज्यकारभार या मूलभूत गुण-कौशल्य असलेले ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व होते. शहाजीराजांनी आदिलशाही तसेच निजामाकडे सुभेदार म्हणून मोठे पराक्रम केले. त्यांनी पुण्यासारख्या भागात मराठी जनतेला आपला पराक्रम तर दाखवला होताच पण त्याचबरोबर कर्नाटकातदेखील त्यांनी आपले कर्तृत्व गाजवले होते. उद्बोधक व ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या संकलित लेखात पाहुया... संपादक.**

मालोजी भोसले यांची पत्नी दीपाबाई (उमाबाई) हिच्या पोटी वेरूळ इथे शहाजी राजे यांचा जन्म दि.१८मार्च १५९४ रोजी झाला. शहाजींच्या जन्मतारखेबद्दल इतिहासकारांत मतभेद आहेत. काहींच्या मते मालोजी भोसले यांची मुख्य राणी उमा ही असून तिच्या पोटी शहाजी यांचा जन्म झाला, असे सांगितले जाते. बाबाजीराजे भोसले यांच्या घरात मालोजीराजे भोसले आणि उमाबाई भोसले यांच्या पोटी शहाजीराजे यांचा जन्म झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या मातोश्री उमाबाईंनी अहमदनगरजवळील शहाशरीफ पीराला अहमदनगर जवळील मुकुंदनगर भागात तारकपूर बस स्टँडपाशी नवस बोलल्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली. पुढे सिंदखेडराजा येथील लखुजीराव जाधव यांच्या मुलीशी म्हणजेच जिजाबाईंशी शहाजीराजे यांचा डिसेंबर इ.स.१६०५मध्ये विवाह झाला. या वेळी लखुजीराव व मालोजीराजे हे दोघेही निजामशाहीत होते. पुढे लगेचच मालोजीराजांचा दुर्दैवी मृत्यू झाला. कालांतराने जसेजसे शहाजीराजे मोठे होत गेले, तसतशी पराक्रम, राजकारण, मुत्सद्देगिरी या बाबतीत त्यांची कीर्ती वाढत सर्वदूर पसरत गेली. अहमदनगर जवळच्या भातवडी येथे झालेल्या युद्धात शहाजीराजे यांनी प्रथम गनिमी काव्याचा वापर केला. जिथे मोघल सैन्य वस्तीला होते त्यावरील भागात असलेल्या धरणाची भिंत फोडून दहा हजार सैन्यानिशी दोन लाख सैन्याच्या पाडाव केला. दि.१६ सप्टेंबर १६३३ रोजी संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील भिमगडावर-शहागडावर लहानग्या मुर्तजा या निजमास मांडीवर घेऊन स्वतः सिंहासनाधिश्वर झाले व हे राज्य सलग तीन वर्षे चालवले म्हणजेच स्वराज्याचा संकल्प शाहागडवर घेतला. म्हणूनच शहागड हा किल्ला पुढे शहाजी महाराजांची स्वराज्य संकल्प भूमी म्हणून उदयास आली.

मालोजीराजे भोसले आपला भाऊ विठोजीराजे भोसले इ.स.१५७७मध्ये सहकुटुंब सिंदखेड येथे लाखुजीराजे जाधव यांच्याकडे नोकरीस आले होते. तद्नंतर शहाजींचे पिता मालोजीराजे यांनी लखुजीराजे जाधव यांची नोकरी सोडून इ.स.१५९९ साली अहमदनगरच्या निजामाची नोकरी मिळवली. मुघल शहेनशाह शहाजाहा याने इ.स.१६२४ लष्कर खानला १.२ लाखाचे सैन्यासह रवाना केले. सोबत आदिलशहा ८० हजाराचे सैन्य घेऊन निघाला. शहाजीराजांकडे २० हजाराचे सैन्य होते. त्यातील १० हजार अहमदनगरच्या रक्षणासाठी ठेवून १० हजार त्यांनी स्वतःकडे ठेवले. एवढ्या मोठ्या सैन्याला प्रचंड पाणी लागेल म्हणून मुघल आणि आदिलशाही सैन्याने उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या मेखरी नदीजवळ भातवडी येथे छावणी उभी केली. एरवी दुष्काळी असलेल्या अहमदनगरला तेव्हा चांगला पाऊस झाला होता. शहाजीराजांनी छावणीच्या उत्तरेस धरणाला असे तडे पाडले, की रात्री झोपलेल्या मुघल आणि आदिलशाही छावणीला काही कळण्यापूर्वीच छावणीची वाताहात झाली. तेव्हा अनेक योद्धे शहाजीराजांचे बंदी झाले आणि शहाजीराजांचे नाव भारतवर्षात दुमदुमले. याच लढाईत शहाजीराजांचे बंधू शरीफजी धारातीर्थी पडले. भातवडी हे गावं अहमदनगर पासून १५ किमी अंतरावर आहें.



**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु.पो.ता.जि.गडचिरोली**
**दूरभाष- ७७७५०४१०८६.**

शहाजीराजांनी आपले पुत्र छ.शिवाजी महाराजांना पुण्यात आपल्या जहागिरीवर स्वतंत्र कारभार चालविण्यासाठी पाठवून स्वराज्य स्थापनेसाठी बरीच अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली. शिवाजीराजांबरोबर दादोजी कोंडदेव, बाजी पासलकर, रघुनाथ बल्लाळ अत्रे, कान्होजी जेधे नाईक व सातारचे शिंदे देशमुख हेही पुण्यात आले. राज्यकारभारासाठी आवश्यक राजमुद्राही शहाजीराजांनीच शिवरायांना दिली. छ.शिवाजींच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी आणि शहाजीराजांची यांस फूस आहे या संशयाने आदिलशाहीने मुख्य वजीर नवाब मुस्तफाखान याने बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, बाजी पवार, बाळाजी हैबतराव, फतहखान, आझमखान यांच्या साहाय्याने शहाजीराजांना दगा देऊन कर्नाटकातील जिंजीजवळ कैद केले. साखळदंडांनी बांधून भर विजापुरातून शहाजीराजांना दरबारात हजर करण्यात आले. तो दिवस होता २५ जुलै १६४८चा. हे कळताच शिवाजी महाराजांनी मुत्सद्दीपणाने राजकारण करत दिल्लीत मोगल सुलतान शहाजहानला एक पत्र पाठवले. स्वतः आपण व आपले पिता शहाजीराजे हे दिल्लीपतीची चाकरी करू इच्छितात, असे त्यांनी लिहिले. याबदल्यात शहाजीराजांची विजापूरच्या कैदेतून मुक्तता करावी, ही अट घातली. अशा प्रकारे शिवाजी महाराजांनी शहाजीराजांच्या सुटकेसाठी दिल्लीच्या बादशहाला मधाचे बोट लावले होते, हा प्रयत्न यशस्वी ठरला. शहाजीराजांची दि.१६ मे १६४९ रोजी सन्मानपूर्वक सुटका झाली.

अफझलखान स्वराज्यावर चालून आला, तेव्हा अफझलखानाची दगाबाजी माहिती असल्याने शहाजीराजेंनी १७,००० फौज विजापूर बाहेर खडी ठेवली होती. शहाजीराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की त्यांनी स्वाभिमान राखत आदिलशाही, मुघलशाही व निजामशाही-या सर्व सत्ताधीशांकडे काम केले. त्यांच्या कारकिर्दीचे महत्त्वाचे टप्पे असे- इ.स.१६२५ ते इ.स.१६२८- आदिलशाही, इ.स.१६२८ ते इ.स.१६२९- निजामशाही, इ.स.१६३० ते इ.स.१६३३- मुघलशाही, इ.स.१६३३ ते इ.स.१६३६ - निजामशाही, इ.स.१६३६ ते इ.स.१६६४ - आदिलशाही, पुढे इ.स.१६६१-इ.स.१६६२ दरम्यान शहाजीराजे महाराष्ट्रात आले होते. त्यांनी त्यानंतरचा काही काळ शिवाजीराजे व जिजाबाईंसमवेत घालवला. आपण लावलेल्या स्वराज्याच्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाल्याचे पाहून ते धन्य झाले. काही काळानंतर ते पुन्हा आपल्या जहागिरीत परतले. माघ शुद्ध ५, म्हणजेच दि.२३ जानेवारी, इ.स.१६६४ रोजी होदेगिरीच्या जंगलात शिकारीला गेले असताना त्यांच्या घोड्याचा पाय एका वृक्षवेलीमध्ये अडकला, ते खाली कोसळले आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजांनी राजपरंपरेप्रमाणे शहाजीराजांची उत्तरक्रिया केली व समाधी शिमोग्याजवळ होदेगिरी जिल्हा दावणगिरी- कर्नाटक येथे बांधली.

!! जयंतीच्या पावन पर्वावर शहाजीराजांना कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

## आजी-माजी सैनिक संघटनांनी गाव पातळीवर लक्ष्य केंद्रित करावे-ले कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त)

**पारनेर । प्रतिनिधी**

आजी माजी सैनिक व त्यांच्या परिवारांची कामे तसेच सवलती देण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, केंद्रीय सैनिक बोर्ड, राज्य सैनिक बोर्ड, जिल्हा सैनिक बोर्ड तसेच काही सामाजिक संस्था कार्य करत असतात. शासन वेळो वेळी शासन निर्णय व सवलती जाहीर करीत असतात.

शासन आदेश, सवलतीं तसेच सैनिकांच्या समस्या यांची गाव पातळीवर अंमलबजावणी/समाधान होणे आवश्यक असते. त्यासाठी सैनिक संघटनांनी गाव पातळीवर कामे व मार्गदर्शन करत राहावे असे आवाहन ले कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त) यांनी केले.शहीद जवान योगेश विनायक काटे यांचे १०वे पुण्यस्मरण कार्यक्रम गाव रांधे ता पारनेर जिल्हा



अहमदनगर येथे बुधवार दिनांक १३ मार्च रोजी आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमात पारनेर तालुका व नगर जिल्ह्यातील अनेक सैनिक संघटनेचे पदाधिकारी, त्यांचे परिवार असेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.देशसेवा ही सर्वात उत्तम सेवा असून देशसेवा करीत असतांना आलेले मरण हे सर्वात उत्तम मरण असते असे ते म्हणाले.सर्व आजी माजी सैनिक संघटना तसेच उपस्तीत जनसमुदाय तर्फे शहीद जवान योगेश काटे यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

## सोलापूरात झालेल्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात नगरच्या वाचनालयाची दखल

**अहमदनगर । प्रतिनिधी**

श्री नागनाथ देवस्थान ट्रस्ट व कवी फुलचंद नागटिळक प्रतिष्ठानच्या वतीने धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयास आदर्श ग्रंथालय पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापिठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांच्या हस्ते वाचनालयाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

वीसावे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन खैराव ता. म्हाडा (जि. सोलापूर) येथे पार पडले. यावेळी ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविणाऱ्या वाचनालयास पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी सिने अभिनेते फुलचंद नागटिळक, भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मनोज कदम, कवी संमेलनाचे अध्यक्ष स्मिता पाटील, प्राचार्य सुभाष नागटिळक, अनिल पाटील आदी उपस्थित होते.

धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून पै. नाना डोंगरे यांनी निमगाव वाघा (ता. नगर) येथे चार काव्य संमेनल घेवून नवोदीत कवींना प्रोत्साहन देण्याचे कार्य केले. तर विद्यार्थ्यांसाठी निबंध, काव्य लेखन, वक्तृत्व स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेवून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे काम ते करत आहे. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध पुस्तकांसह स्पर्धा परीक्षांचे पुस्तके देखील वाचनालयाच्या माध्यमातून ते उपलब्ध करुन देत आहे. या कार्याची दखल घेऊन वाचनालयास आदर्श ग्रंथालय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

## ढवळपुरी येथे 'लोकर प्रक्रिया केंद्र' स्थापन करण्यास शासनाच्या जमिनीस मिळाली मान्यता: खा. डॉ. सुजय विखे पाटील

**पारनेर । प्रतिनिधी**

मौजे ढवळपुरी (ता.पारनेर) येथे 'लोकर प्रक्रिया केंद्र' स्थापन करण्यासाठी शासनाच्या १.७० हेक्टर जमिनीस मान्यता देण्यात आली आहे. मेंढपाळ बांधवांच्या हिताचा निर्णय घेऊन त्यांच्या मागणीला महायुती सरकारमार्फत न्याय देण्यात आला असल्याचे मत खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले.

तसेच ते पुढे म्हणाले की, ढवळपुरी येथे लोकर प्रक्रिया केंद्र स्थापन व्हावे आणि त्यासाठी शासनाची जमीन उपलब्ध व्हावी याकरिता माझे प्रयत्न सुरू होते आणि यासाठी वेळोवेळी पाठपुरावा देखील केला होता. आज त्या प्रयत्नांना यश मिळाले असून निश्चितच मेंढपाळ बांधवांसाठी आजचा दिवस हा ऐतिहासिक असा ठरणार आहे. कारण मेंढपाळांची पंढरी म्हणून ढवळपुरी गावाला ओळखले जाते. त्यामुळे लोकर प्रक्रिया केंद्र येथे स्थापन होणे ही काळाची गरज होती. विशेष म्हणजे नुकत्याच काही दिवसांपूर्वी सदरील प्रकल्पास पारनेर तालुक्यातील करंदी येथे निर्माण करण्याचे नियोजन होते. कारण ढवळपुरी येथील के. के. रेंजमुळे हा प्रकल्प शासनाकडून नाकारण्यात आल्याचे समोर आले होते. दरम्यान मेंढपाळ बांधवांची मागणी लक्षात घेता पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सदरील केंद्र निर्माण करण्याच्या अनुषंगाने ज्यांची कोणाची हरकत असेल तर तसे शासनास कळवावे. त्यावर योग्य तो विचार करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. आज त्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आली आहे. दरम्यान आज शासनातर्फे १.७० हेक्टर जमिनीस मान्यता देण्यात आली असून



मेंढपाळ बांधवांचा प्रश्न हा सुटला आहे. मौजे ढवळपुरी येथील मेंढपाळांची संख्या व त्यांची असणारी मागणी या बाबींचा विचार करता मौजे ढवळपुरी ता. पारनेर, अहमदनगर येथे लोकर प्रक्रिया केंद्राची स्थापना झाल्यास मेंढपाळांसाठी सोयीचे होणार असल्यामुळे मौजे करंदी ता. पारनेर ऐवजी मौजे ढवळपुरी येथील ग. नं. १०२१ मधील क्षेत्र २ हे. १० आर पैकी निर्बाध्यरीत्या वाटपास उपलब्ध असलेले क्षेत्र १ हे. ७० आर एवढ्या शासकीय जमिनीस शासनाची मान्यता देण्यात आली आहे. अशी माहिती खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.तसेच मेंढपाळ बांधवांच्या हिताचा निर्णय घेऊन त्यांच्या मागणीला न्याय दिल्याबद्दल त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## फुटबॉल खेळाडूंना लाभ घेण्याचे आवाहन


**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील नवोदित फुटबॉल खेळाडूंना प्रोत्साहन व दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लबच्या वतीने एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून फुटबॉल प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आले आहे. या प्रशिक्षण वर्गाचा फुटबॉल खेळाडूंना लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.फिरोदिया शिवाजीयन्सचे नरेंद्र फिरोदिया व मनोज वाळवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण वर्ग होणार असून, यामध्ये उच्च प्रशिक्षित फुटबॉल प्रशिक्षक खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणातून खेळाडूंमध्ये नेतृत्व व खेळाचे कौशल्ये विकसित केले जाणार आहे.सहा वर्षावरील मुले व मुलींना या अकॅडमीत सहभागी होता येणार आहे.अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर सायंकाळी ४:३० ते ६:३० या वेळेत होणाऱ्या प्रशिक्षण वर्गासाठी ग्रास ग्राउंड व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मैदान सज्ज केले जाणार आहे. खेळाडूंच्या नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी ८७९६८५८९४७ व ८२०८७७१७९५ या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# सोलापूर,माढ्यात ७ मे रोजी मतदान; उमेदवाराच्या शोधात माढ्यात 'मविआ'ची,सोलापुरात'भाजपची' दमछाक

**सोलापूर (वृत्तसंस्था):** केंद्रीय निवडणूक आयोगाने केलेल्या घोषणेनुसार जिल्ह्यातील सोलापूर आणि माढा या दोन्ही लोकसभा मतदारसंघात आजपासून ५१ व्या दिवशी म्हणजे ७ मे रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी जवळपास दोन महिने प्रचाराची रणधुमाळी चालणार आहे.गेल्या काही दिवसांपासून लोकसभेची आचारसंहिता कधी लागणार याची चर्चा रंगली होती. अखेर आज निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या वेळापत्रकाची घोषणा केल्यानंतर आचारसंहिता लागू केली.

आचारसंहितेपूर्वी प्रशासकिय मान्यतेचा सपाटा लावणाऱ्या यंत्रणांनी आज मोकळा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून जिल्हा परिषद, महापालिका, नगरपरिषद व पंचायत समित्यांमध्ये प्रशासकिय कामांना मान्यता देण्यासाठी शासकिय यंत्रणा, आमदार व खासदार, त्यांचे स्वियं सहाय्यक कमालीच्या धावपळित दिसत होते.भाजपने राज्यातील उमेदवारांच्या पहिल्या यादीत माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी देऊन बाजी मारली आहे. या उमेदवारीमुळे नाराज झालेल्या मोहिते-पाटील व आमदार रामराजे नाईक निंबाळकर समर्थकांची कशी समजूत काढायची? हा नवा प्रश्न मात्र भाजपसमोर उभा राहिला आहे.दोन टर्मपासून भाजपच्या ताब्यात असलेल्या सोलापूर लोकसभा मतदार संघातील उमेदवारी जाहीर करताना यंदा भाजपची दमछाक होताना दिसत आहे. सोलापुरात भाजपकडून यावेळी स्थानिक व 'ओरिजनल एस.सी.' उमेदवार देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यातून माळशिरसचे आमदार राम सातपुते, माजी खासदार अमर साबळे, माजी खासदार शरद बनसोडे, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांची नावे समोर येऊ लागली आहे.कॉंग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी सोलापुरची उमेदवारी निश्चित मानून मंगळवेढा, मोहोळ, दक्षिण सोलापूर व सोलापूर शहरात प्रचाराला सुरुवातही केली आहे. माढ्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार यांच्याकडे सध्या तुल्यबळ उमेदवार दिसत नाही.मोहिते-पाटलांची नाराजी, शरद पवार व उध्दव ठाकरे यांच्याबद्दल असलेली सहानभुती यामुळे माढ्यात चांगला उमेदवार दिला तर येथे विजयाचा गुलला उधळण्याची स्वप्न राष्ट्रवादीला पडू लागली आहेत.त्यातूनच आता रासपचे नेते महादेव जानकर, कै. गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. अनिकेत देशमुख, करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांची नावे समोर येऊ लागली आहे. येत्या चार ते पाच दिवसांमध्ये उमेदवारांची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यानंतर खऱ्या अर्थाने राजकिय रणधुमाळीला वेग येणार आहे.सोलापूर लोकसभा मतदार संघात सोलापूर शहरासोबतच अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर शहर व ग्रामीणचा काही भाग, मंगळवेढा, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर हे तालके येतात. माढा लोकसभा मतदार संघात करमाळा, माढा,माळशिरस, सांगोला या सोलापूर जिल्ह्यातील तालुक्यांशिवाय सातारा जिल्ह्यातील फलटण, माण, खटाव व कोरेगाव तालुक्यातील काही गावे येतात. उन्हाचा कडाका वाढत असताना अवघ्या ५० दिवसांमध्ये मतदारसंघ पिंजून काढण्याचे मोठे आव्हान उमेदवारांच्या समोर असणार आहे. वाड्या-वस्तीवरील मतदारांपर्यंत पोचण्यासाठी उमेदवारांचा कसं लागणा आहे.



# बांधकाम कामगार महिलांना भांडी साहित्य वाटपासाठी व धुणीभांडी करणाऱ्या महिलांना कामगार कार्ड मिळवून देण्यासाठी दलालांकडून पैशांची मागणी

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील बांधकाम कामगारांसाठी सरकारने सुरू केलेल्या मोफत भांडी साहित्याचे वाटप करण्याच्या योजनेमध्ये दलालांनी नामी शक्कल वापरून प्रत्येकी दोन हजार रुपये घेऊन महिलांची फसवणूक करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यामध्ये गोरगरीब व अशिक्षित महिलांची आर्थिक पिळवणूक व फसवणूक होत असल्याची तक्रार भाजपाच्या ओबीसी विभागाच्या मराठवाडा संयोजक तथा रणरागिनी महिला मंडळाच्या प्रमुख, कष्टकरी महिलांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून संघर्ष करणाऱ्या महादेवी मठपती यांनी कामगार उपायुक्त देशमुख साहेबाकडे याची तक्रार केली आहे. पंचायत समिती नांदेड बीडीओ साहेबांना आज अनेक कष्टकरी महिला सोबत भेट त्यांनी घेऊन होत असलेल्या आर्थिक पिळवणुकीबद्दल माहिती दिली. निळा येथील महीलांना रोजगार हमीचे कार्ड रिनीव्हल करुन देते म्हणून दलाल १५०० ते २००० हजार रूपयांची मागणी करत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे योजनेसाठी पात्र असलेल्या कष्टकरी कामगार महिलांनी गावातील सरपंच ग्रामसेवक यांना अधिकृत भेटून हे कार्ड मिळविण्यासाठी अर्ज करावेत. त्यामुळे दलालांना आपोआप चाप बसेल. असे यावेळी महादेवी मठपती यांनी सांगितले.

या प्रश्नासंदर्भात त्यांनी नुकताच शेकडो महिलांना घेऊन कामगार उपायुक्त यांना घेराव घातला होता. बांधकाम कामगार कार्ड मिळवून देण्यासाठी व धुणी भांडी कार्ड गोरगरीब व अशिक्षित महिलांना काढून देण्यासाठी दलालांच्या करवी दोन ते तीन हजार रुपये मागितले जात आहेत. यामध्ये हजारो रुपयांची कमाई हे दलाल करत आहेत. गोरगरीब महिलांकडून हे पैसे दलाल उकळीत आहेत. बांधकाम कामगार कार्ड व धुणी भांडी कामगार कार्ड मिळविण्यासाठी नाईलाजास्तव हजारो रुपये गोरगरीब महिलांना मोजावे लागत आहेत. अधिकारी व दलाल यांची मिली भगत असल्यामुळे



या विरोधात कोणीच आवाज उठवत नाही. त्यामुळे दलालांचे चांगलेच फावत आहे. त्यामुळे दलालांना शासकीय कार्यालयात प्रवेश दिला जाऊ नये व प्रत्यक्ष कामगार महिला कार्यालयात आल्यासच त्यांना बांधकाम कामगार कार्ड व धुणीभांडी कामगार कार्ड देण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली आहे. असे झाल्यानंतर दलालांची वरकमाई बंद होईल. योजनेसाठी पात्र असणाऱ्या महिलांना त्या योजनेचा फायदा व्हावा यासाठी अधिकाऱ्यांनी शासकीय कार्यालय दलाल मुक्त करावे अशीही मागणी पुढे येत आहे. शासकीय कार्यालय दलालमुक्त झाल्यास महिलांची होणारी आर्थिक पिळवणूक बंद होईल. शासनाच्या योजना तळागाळातील गोरगरीब महिलांना मोफत पोहोचाव्यात यासाठी महादेवी मठपती नेहमीच कार्यतत्पर असतात. गोरगरीब कष्टकरी व वंचित महिलांनी त्यांच्याकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी ताबडतोब कामगार उपायुक्त व बिडिओ कार्यालयात धाव घेऊन वरिष्ठांना या संदर्भात जाब विचारला. कष्टकरी महिलांची होणारी आर्थिक पिळवणूक दलालाकडून होत असल्यामुळे याला पायबंद घालावा अशी मागणी त्यांनी केली आहे. यापुढे दलाल शासकीय कार्यालयात महिलांकडून पैसे घेताना दिसल्यास त्वरित आंदोलन केले जाईल असाही इशारा महादेवी मठपती यांनी दिला आहे. यावेळी निळा गावातील कष्टकरी शोषीत महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आमदार आमश्या पाडवी यांचा शिंदे गटात प्रवेश मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत धरली शिंदेसेनेची वाट

## निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाला जबर धक्का



**मुंबई**–लोकसभा निवडणूक जाहीर झाली असताना उद्धव ठाकरे गटाला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. विधान परिषद सदस्य आमश्या पाडवी यांनी आज शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी रविवारी दुपारी शिंदे गटात प्रवेश केला आहे. यासह काही नगरसेवकांचा सुद्धा शिवसेना शिंदे गटामध्ये प्रवेश झाला आहे. यावेळी घरात बसून उंटावरून शेळ्या हाकणारा हा मुख्यमंत्री नाही असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे. ज्यांच्याकडे शिवसैनिकच उरले नाहीत. ते खरी शिवसेना कसे असणार? असा खोचक सवाल मुख्यमंत्री शिंदेंनी केला. तसेच बाळासाहेबांच्या विचारांचे सरकार आम्ही आणले. हजारो कार्यकर्ते आमच्यासोबत येत आहे. खरी शिवसेना आम्हीच असून आमच्याकडेच धनुष्यबाण आहे. आम्हाला कचरा म्हणाऱ्यांचा एक दिवस कचरा झाल्याशिवाय राहणार नाही'', अशी टीका शिंदेंनी केली.तसेच पुढे ते म्हणाले, आमच्या सभांना मोठी लाखोंची गर्दी होत असते. ती गर्दी पाहून आम्ही घेतलेला निर्णय योग्य वाटतो. आम्ही सरकार आल्यावर शेतकऱ्यांसाठी अनेक निर्णय घेतले. ज्यांच्याकडे शिवसैनिक आहेत त्यांच्याकडेच खरी शिवसेना आहे'', असेही शिंदेंनी यावेळी ठणकावून सांगितले.गेल्या काही दिवसांपासून आमश्या पाडवी शिवसेना शिंदे गटाच्या मार्गावर असल्याचे चर्चा रंगली होती. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी चेहरा म्हणून ते ओळखले जातात. २०२२ मध्ये विधानपरिषद निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरे यांनी पक्षातील बड्या नेत्यांना बाजूला करत त्यांना विधानपरिषदेची उमेदवारी देत निवडून आणले होते. यासाठी त्यांनी पक्षातील नाराजी सुद्धा ओढवून घेतली होती.दरम्यान पाडवी आणि सचिन अहिर यांची विधान परिषदेवर निवड झाल्यानंतर शिवसेनेला खिंडार पडले होते. निकाल जाहीर होताच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अनेक आमदार सुरत आणि नंतर गुवाहाटीकडे रवाना झाले होते. आमश्या पाडवी यांनी मात्र उद्धव ठाकरेंबरोबर राहाणे पसंत केले होते.आमश्या पाडवी यांनी नंदुरबार जिल्ह्यामध्ये शिवसेना वाढीमध्ये मोठे योगदान दिले होते. पाडवी यांचा गेल्या दोन विधानसभा निवडणुकीमध्ये पराभव झाला होता. २०१४ आणि २०१९ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या के. सी. पाडवी यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. मात्र, त्यांना दोन्ही वेळेस पराभव पत्करावा लागला. २०१९ मध्ये झालेली निवडणुकीमध्ये पाडवी यांनी ८० हजार मते घेतली होती.

## लक्ष्मीच्या हाती नेहमी कमळ असते, त्यावर शंका घेऊ नये

# भविष्यातील लढाई सोपी नाही, भाजप प्रवेशावर नवनीत राणा यांचे सूचक वक्तव्य





**अमरावती**–लक्ष्मीच्या हाती नेहमी कमळ असते, त्यावर कोणीही डाऊट घेऊ नये असे सूचक विधान अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी केले आहे. गेल्या काही दिवसांपासून त्या भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवतील अशा चर्चा सुरू होत्या. मात्र आता त्यांनी स्वतःच सूचक विधान करत याबाबत संकेत दिल्याचे बोलले जात आहे.

अमरावतीच्या संस्कृती भवन परिसरात युवा स्वाभिन पक्षाचा कार्यकर्ता मेळावा शनिवारी पार पडला. यावेळी नवनीत राणा बोलत होत्या. यावेळी एनडीएकडून लढण्यासाठी कर्यकर्त्यांचा ठराव एकमताने मंजूर झाला आहे. मोदी, शहा आणि फडणवीस यांच्याकडून कोणताही प्रस्ताव आला तर त्याला युवा स्वाभिमान पक्ष पाठिंबा देईल असा ठराव मंजूर करण्यात आला. हे सांगताना खासदर नवनीत राणा यांना अश्रू अनावर झाले.

तसेच ''मोदी, शहा, फडणवीस आणि रवी राणा जे ठरवतील तो निर्णय मला मान्य आहे. लोकांना अजून उमेदवार सापडले नाही पण आमचा प्रचार पूर्ण झाला आहे. त्यामुळे रवी राणा यांनी घेतलेला कोणताही निर्णय मला मान्य आहे. आज मी युवा स्वाभिमान पक्षाची खासदार म्हणून मी इथे उभी आहे पुढे काय निर्णय होईल मला माहित नाही. येणाऱ्या भविष्यातील आपली लढाई सोपी नाही'', असेही नवनीत राणा म्हणाल्या.यावेळी आ.राणा म्हणाले, युवा स्वाभिमान पक्ष मागील १२ वर्षांपासून एनडीएचा घटक पक्ष आहे. या निवडणुकीतही आम्ही एनडीएसोबतच आहोत.नवनीत राणा या उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. तसे काही संकेत आम्हाला मिळाले आहेत. या निवडणुकीत भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांची राष्ट्रवादी गटाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्रित येऊन या ठिकाणी काम करतील, असा आम्हाला विश्वास आहे.दरम्यान, अमरावतीच्या खासदार नवनीत राणा या भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याचा दावा गेल्या काही दिवसांपासून केला जात आहे. यासंदर्भात गुरुवारी नवनीत राणा यांचे पती आणि आमदार रवी राणा यांनी नागपूर येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत नवनीत राणा कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार यावर चर्चा झाल्याचं सांगितलं जात आहे.

# मुंबई गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासासाठी केंद्रीय सहकारी विकास मंडळाकडे अर्थपूरवठ्याची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक नोडल एजन्सी आहे. मोठ्या प्रमाणावर स्वयंपुनर्विकासासाठी गृहनिर्माण संस्था आल्याने मुंबई जिल्हा बँकेने केंद्रीय सहकारी विकास महामंडळाकडे अर्थपूरवठा करण्यासाठी विनंती केली आहे. जेणेकरून स्वयंपुनर्विकासाच्या वाढत्या मागणीला पुरवठा करता येईल.

मुंबईत गृहनिर्माण स्वयंपुनर्विकास प्रकल्प सुरू आहेत. ज्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजश्रय दिला. याकरिता मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नोडल एजन्सी आणि राज्याकरिता राज्य सहकारी बँकेला नेमले आहे. स्वयंपुनर्विकास प्रकल्पाला वाढता प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे मोठ्या आर्थिक अर्थपूरवठ्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राचे केंद्रीय स्तरावरील नॅशनल को–ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनसीडीसी), केंद्रीय सहकार मंत्र्यांकडे मुंबई जिल्हा बँकेने अर्थपूरवठा करण्याची मागणी केली आहे. जेणेकरून मुंबईतील हौसिंग सोसायट्यांना अर्थपूरवठा करता येईल व स्वयंपुनर्विकास गतीने कार्यान्वित होईल. याकरिता मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष, आमदार प्रविण दरेकर यांनी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची भेट घेऊन पत्र दिले होते. तसेच स्वयंपुनर्विकासाला हातभार लावण्याची मागणीही केली होती. अमित शहा यांनी यात लक्ष घालून यासंदर्भात कार्यवाही करत असल्याचे सांगितले आहे.

# नामांकीत निवासी शाळांमध्ये प्रवेशा साठी अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी । प्रतिनिधी**

सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात हिंगोली व परभणी या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला–मुलींना इयत्ता १ ली व २ री मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देणे बाबत प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत जोडावी. विद्यार्थी दारिद्रय रेषेखालील असेल तर त्यासंबंधीत छायांकित प्रत व दारिद्रय रेषा अनुक्रमांक नमुद करावा. पालकाची उत्पन्न मर्यादा ही १ लाख रुपये एवढी असुन यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत वैधता असणारे उत्पन्न प्रमाणपत्र जोडण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा तसेच इयत्ता २ री साठी बोनाफाईड प्रमाणपत्र सोबत जोडावे, रहिवाशी प्रमाणपत्र व वैद्यकीय अधिकारी यांचे विद्यार्थी निरोगी असल्याचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विद्यवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्रय रेषेखालील कुंटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांचे पालक शासकीय/ निमशासकीय नोकरदार नसावेत. प्रकल्प कार्यालयात दि. ५ एप्रिल पासून प्रवेश अर्ज विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.या योजने अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर होणारा संपुर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार आहे. योजनेचा लाभ घेणेसाठी, प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी जि. हिंगोली येथे संपर्क साधावा तसेच अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्यासाठी परिपूर्ण प्रवेश अर्ज दि. ३० एप्रिल, २०२४ पर्यंत सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे यांनी केले आहे.

# माजी सरपंच बंडूभाऊ मस्के आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे धारूर तालुकाध्यक्ष अमोल जगताप यांच्या शुभहस्ते पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे उद्घाटन संपन्न

## धारूर व वडवणी तालुक्यातील तरुणांना पीपीएल प्रीमिअर लीगच्या माध्यमातून खेळाच्या मैदानात आणण्यासाठी यशस्वी झालोत–माजी सरपंच मस्के







**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथे माजी सरपंच तथा संजय गांधी निराधार योजनेचे धारूर तालुका समितीचे सदस्य बंडू भाऊ मस्के व तारकेश्वर क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे आयोजन करण्यात आले आहे या पीपीएल प्रीमिअर लीगचे शनिवार दि.१६ मार्च २०२४ पासून प्रारंभ झाला आहे. ग्रामीण भागामध्ये प्रथमच इतक्या मोठ्या रकमेचे बक्षीस व क्रिकेट सामन्याचे यूट्यूब चॅनलवर लाईव्ह प्रक्षेपण असणाऱ्या पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे माजी सरपंच बंडूभाऊ मस्के व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे धारूर तालुकाध्यक्ष अमोल जगताप यांच्या शुभहस्ते उद्घाटन तारकेश्वर क्रीडांगणामध्ये संपन्न झाले. पीपीएल प्रीमिअर लीग मध्ये एकूण दहा क्रिकेटचे संघ सहभागी झालेले आहेत या क्रिकेट स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाला तब्बल ५१००० रुपयांचे बक्षीस मा. सरपंच तथा संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य भावी जिल्हा परिषद सदस्य संबोधले जाणारे बंडू भाऊ मस्के यांच्यावतीने दिले जाणार आहे तर द्वितीय क्रमांकाचे ३१००० रुपयाचे बक्षीस बीड जिल्हा कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य गोरख आबा पुर्णे यांच्या वतीने ठेवले आहे तर धारूर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सटवा अंडील यांच्या वतीने तृतीय क्रमांकाचे ११००० रुपयाचे बक्षीस आहे तसेच स्व.गोकुळ टायर्स प्रो.भागवत अंडील यांच्या वतीने चतुर्थ क्रमांकाचे ७७०० रुपयांचे बक्षीस विजयी संघाला दिले जाणार आहे. युवा नेते सुरेश अंडील ऑरेंज कॅप तर गणेश धर्मराज मुंडे मॅन ऑफ द सिरीज सायकल तर सुरेश गणेश अंडील फायनल मॅन ऑफ द मॅच २१०० रु.तसेच अक्षय भैय्या मित्र मंडळ धारूर प्रति मॅच मॅन ऑफ मॅच ट्रॉफी व ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटोळे प्रति सामना हॅट्रिक करणाऱ्या बॉलरला ११०० रू. आदींनी बक्षीस ठेवण्यात आलेली आहेत.पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे संयोजक म्हणून अमोल मस्के, माणिक मस्के,उमेश अंडील, दिनेश अंडील,भागवत मुंडे, संतोष मुंडे,दादासाहेब अंडील, गोविंद रुद्रे,अनंत बिल्पे,पवन पूर्णे,माणिक मुंडे,भागवत साक्रुडकर,शैलेश अंडील,शुभम अंडील,महादेव वरकले,शंभूदेवा मुंडे,अशोक वरकले,अक्षय सूर्यवंशी,वैजनाथ रुद्रे,अमोल शिंदे,बंडू मुंडे काम पाहत आहेत. पीपीएल प्रीमिअर लीगची माहिती व प्रसिद्धी बाजीराव अंडील,प्रदीप अंडील,रमेश मुंडे,मेघराज मुंडे यांनी केली आहे. पी पी एल प्रीमियर लीगच्या उद्घाटन प्रसंगी तालुकाध्यक्ष अमोल जगताप तसेच उपसरपंच राहुल चव्हाण,बापू चव्हाण, माजी सरपंच बंडूभाऊ मस्के,राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष सटवा अंडील, ग्रामपंचायत सदस्य धर्मराज मुंडे,युवा नेते सुरेश अंडील,ग्रामपंचायत सदस्य माणिक मस्के या सर्व मान्यवरांचे तारकेश्वर क्रीडा मंडळ व संयोजक समितीने शाल,पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले या प्रसंगी माजी सरपंच बंडूभाऊ मस्के यांनी पीपीएल प्रीमिअर लीगच्या पाठीमागीलची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की,आजचे तरुण वर्ग हा मोबाईलच्या जगात व्यस्त झाला आहे मोबाईलवर गेम खेळणे, युट्युब,फेसबुक,इंस्टाग्रामच्या विश्वातून खेळाच्या मैदानात आणण्यासाठी पहाडी पारगाव प्रीमिअर लीग आयोजन केले असे आपले मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले त्यानंतर संघर्ष चिंचाळा विरुद्ध एकता इलेव्हन वडवणी या संघातील खेळाडूंची ओळख करून मान्यवरांनी घेतली उद्घाटन झाले असे जाहीर केले व सामन्याला प्रारंभ झाला.या प्रसंगी दिनेश अंडील,युवा उद्योजक उमेश अंडील,प्रदीप अंडील,रमेश मुंडे,फोटोग्राफर दादासाहेब अंडील,मेघराज मुंडे तसेच धारूर व वडवणी तालुक्यातील मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग उपस्थित होता पीपीएल प्रीमिअर लीग यशस्वी करण्यासाठी आयोजक तारकेश्वर क्रीडा मंडळ व संयोजक समिती परिश्रम घेत आहे.

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यावर जिल्हा प्रशासनाचा भर-जिल्हाधिकारी विनय गौडा

## चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात एकूण १८ लक्ष ३६ हजार ३१४ मतदार

### ८५ वर्षावरील व दिव्यांग मतदारांना घरून मतदानाची सोय;नियंत्रण कक्ष व विविध संपर्क क्रमांक कार्यान्वित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार १३ – चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची सार्वत्रिक निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज असून आगामी निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यावर जिल्हा प्रशासनाचा भर आहे, असे प्रतिपादन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडी जी.सी. यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात मतदार जनजागृतीकरीता स्वीप योजनेंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्हा प्रशासनातर्फे सायकल रॅली, मिनी मॅरेथॉन व इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यापुढेही जास्तीत जास्त मतदारांनी आपल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करावा, यावर जनजागृती करण्यात येईल. ज्या ठिकाणी ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते, तेथे सुक्ष्म नियोजन करण्याच्या सुचना सर्वांना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात आदर्श आचार संहिता व निवडणूक खर्च पथकांची स्थापना करण्यात आली आहे. चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण ४२ फिरते निगराणी पथक (एफ.एस.टी.), ६२ स्थायी निगराणी पथक (एस.एस.टी.), २९ व्हिडीओ निगराणी पथक (व्ही.व्ही.टी.) , ९ व्हीडीओ पाहणी पथक (व्ही.एस.टी.) ६ खर्च पथक आणि ६ खर्च सनियंत्रक पथक स्थापन करण्यात आले आल्याचे जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी सांगितले.



**चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण १८ लक्ष ३६ हजार ३१४ मतदार :**

१३ – चंद्रपूर लोकसभा मतदार संघात राजूरा, चंद्रपूर, बल्लारपूर, वरोरा, वणी आणि आर्णी या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होत असून एकूण १८ लक्ष ३६ हजार ३१४ मतदार आहेत. यात ९ लक्ष ४५ हजार २६ पुरुष मतदार, ८ लक्ष ९१ हजार २४० स्त्री मतदार आणि इतर ४८ जणांचा समावेश आहे. तर गडचिरोली लोकसभा मतदार संघातील ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ३६ हजार ३८८ पुरुष मतदार, १ लक्ष ३४ हजार ८४० स्त्री मतदार असे एकूण २ लक्ष ७१ हजार २२८ मतदार आहेत. तर चिमूर विधानसभा मतदार संघात १ लक्ष ४० हजार १९७ पुरुष मतदार, १ लक्ष ३६ हजार ६२७ स्त्री मतदार असे एकूण २ लक्ष ७६ हजार ८२४ मतदार आहेत. तसेच चंद्रपूर लोकसभा मतदार संघात १८ ते १९ वयोगटात एकूण २४१२० मतदार आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात एकूण मतदान केंद्रांची संख्या २०४४ असून चंद्रपूर लोकसभा मतदार संघात २११८ मतदान केंद्र आहेत.

**८५ व त्यापेक्षा जास्त वय असलेले मतदार व दिव्यांग मतदार :**

१३ – चंद्रपूर लोकसभा मतदार संघात ८५ व त्यापेक्षा जास्त वय असलेले ७११७ पुरुष मतदार आणि ९५०४ स्त्री मतदार असे एकूण १६६२१ मतदार आहेत. तसेच गडचिरोली लोकसभा मतदार संघातील ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघात ८५ व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांची संख्या २४०३ तर चिमूर विधानसभा मतदार संघात हा आकडा २५९४ आहे. चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण ९६७९ दिव्यांग मतदार आहेत. यात ६१६४ पुरुष दिव्यांग तर ३५१५ स्त्री दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार ८५ व त्यापेक्षा जास्त वय असणा–या मतदारांना तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या दिव्यांग मतदारास गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर सुविधेचा लाभ घेण्याकरीता संबंधित मतदारास १२ डी नमुना परिपूर्ण भरून संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी / सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

**नियंत्रण कक्ष व विविध संपर्क क्रमांक :**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक– २०२४ करीता चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०७१७२– २७१६१७ आहे. सोशल मिडीया नियंत्रण व तक्रारीकरीता पोलिस विभागातर्फे ८८८८५११९११ हा मोबाईल क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून २४ बाय ७ कार्यरत राहणार आहे. याशिवाय जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे तक्रार निवारण / मदत कक्ष, एक खिडकी कक्ष, नियंत्रण कक्ष, आदर्श आचार संहिता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तक्रार निवारण / मदत कक्षाचा टोल फ्री क्रमांक १९५० असून आदर्श आचार संहिता कक्षाचा क्रमांक ८७८८५१००६१ आहे. तसेच सी–व्हिजील / ई.एस.एम.एस. या प वरही तक्रार नोंदविता येणार आहे.

# भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघ केंद्रीय अधिकारी बैठक

**पुलगाव । प्रतिनिधी**

भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघाच्या केंद्रीय अधिकाऱ्यांची बैठक स्थानिय पुलगाव शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आली गौतम इन हॉटेलमध्ये दिनांक १६ व १७ मार्च २४ अशी दोन दिवसीय बैठक पार पडली. या बैठकीत राष्ट्रीय कार्याध्यक्ष बी. एन. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली . यामध्ये राष्ट्रीय सरचिटणीस रामनाथ गणेशी, संघटन मंत्री एस. एन. बाटवे, महासंघाचे सरचिटणीस साधुसिंग, सरचिटणीस .मुकेश सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून भारतमाता, भगवान विश्वकर्मा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आदरणीय दत्तोपंत ठेंगडी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले.प्रमुख पाहुण्यांना शाल व श्रीफळ देऊन भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघ, पुलगावचे अध्यक्ष रविंद्र पिंगळे, सचिव ज्ञानेश्वर पायघन, उपाध्यक्ष अंकुश देशमुख, सी. ई. सी.सदस्य अमोल तितरे , माजी सरचिटणीस सुधाकर राजूरकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.मुकुंद रंगदळे यांनी श्रमिक गीते सादर केले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन




दत्ता पाटोळे यांनी केले.या बैठकीत अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले. नवीन पेन्शन ला विरोध करून जुन्या पेन्शनचा मुद्दा उपस्थित केला.[ जुन महिन्यात निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देऊन मूळ वेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. आठव्या वेतनाच्या अंमलबजावणीबाबत आयोग. १८ महिन्यांची स्थगित थकबाकी. रक्कम लागू करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. दारुगोळा डेपो/फॅक्टरीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जोखीम भत्ता देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. या दोन दिवसीय केंद्रीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत सर्व प्रांतातील ३० प्रतिनिधी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. आभार संघाचे अध्यक्ष रविंद्र पिंगळे यांनी मानले. ही बैठक चांगल्या पद्धतीने पार पाडण्यासाठी भारतीय प्रतिरक्षा भांडार मजदूर संघाचे सदस्य अशोक डोर्लीकर, दीपक चावंडे, लीलाधर बांते, सचिन लुढेल, कमलेश लाकडे, लखमीचंद, गिरीश चरडे, प्रमोद बांते, अतुल देशमुख, प्रकाश कपले व इतर सदस्यांनी परिश्रम घेतले..

# आप्पाजी महाराजांच्या मूर्तीची विठ्ठल मंदिरात प्राणप्रतिष्ठा–ह.भ.प.विष्णूपंत कोल्हे महाराजांचे प्रवचन

**सिंदीरेल्वे । प्रतिनिधी**

स्थानिक विठ्ठल रुक्मिणी मंदिरात स्वाध्याय मंडळाच्या पुढाकाराने सदगुरु रेवणसिध्द उपाख्य आप्पाजी महाराजांच्या मूर्तीची स्थापना रविवारी दुपारी करण्यात आली.

बुधवार दि.१३मार्चपासून सलग पांच दिवस स्वाध्याय मंडळाच्या पुढाकारात रोज मनाचे श्लोकाचे पारायण,पोथी व धार्मिक ग्रंथांचे वाचन करण्यात आले.रोज सकाळ–संध्याकाळी आरती होत असे.शनिवारी रात्री हभप.विष्णूपंत कोल्हे यांनी वैष्णव धर्मावर कीर्तन सादर केले. रविवारी सकाळी सद्गुरुंची पालखी काढण्यात आली. दुपारी विधीवत आप्पाजींच्या अर्धाकृती पुतळ्याची प्राणप्रतिष्ठा मंदिरात करण्यात आली.यावेळी स्वाध्याय मंडळाचे समस्त भक्त ,शिष्यगण आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सायंकाळी स्नेहभोजनाने सोहळ्याची सांगता झाली.यशस्वीतेसाठी प्रल्हाद गोमासे,रजनी सिर्सीकर,प्रतिभा चंदनखेडे, इंदूताई हिंगणेकर,लीला बोकडे,मीरा गोमासे, पारखेडकर भगिणी आदींनी सहकार्य केले.



# आता प्रत्येक शाळेत निनादणार 'जय जय महाराष्ट्र माझा'चा आवाज

**मुंबई–**जय जय महाराष्ट्र माझा हे राज्यगीत आता शाळांमध्ये नियमित म्हटले जाणार आहे. त्यासंदर्भात शासनाकडून आदेश काढण्यात आले आहे. यामुळे बालपणीच विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची गौरवगाथा या गीताच्या माध्यमातून कळणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी मागणी केली होती.मनसेने संदर्भात ट्विट केले आहे. जय जय महाराष्ट्र माझा या गीतास राज्यगीताचा दर्जा महाराष्ट्र राज्य सरकारने दिला. वर्षभरापूर्वी हे गीत राज्यगीत झाले. त्यानंतर या गीताला त्याचा उचित सन्मान मिळत नव्हता. कोणत्याही शैक्षणिक संस्थेत आपलं हे राज्यगीत गायलं वा वाजवलं जात नव्हतं! महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष सन्माननीय अमित ठाकरे यांनी यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना पत्र लिहून ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत राज्यगीत वाजविले अन् गायिले जावे अशी आग्रही अपेक्षा व्यक्त केली.''अमित ठाकरेंच्या या पत्राचा सकारात्मक परिणाम शासन दरबारी झाला. पत्रानंतर तीन आठवड्यांच्या आतच राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने शासन आदेश / परिपत्रक काढले आहे. त्यानुसार, सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या प्रत्येक शाळेत दैनिक सत्र (दररोजचे वर्ग) सुरू होताना राष्ट्रगीत/ प्रार्थना यांसोबत राज्यगीत वाजवले/ गायले जाईल, याची दक्षता शाळा व्यवस्थापनांनी घ्यायची आहे आणि या सूचनेचे पालन होत आहे ना, याची दक्षता सर्व विभागीय शालेय शिक्षण उपसंचालकांनी घ्यायची आहे!

# आदर्श आचारसंहितेचे पालन करा–जिल्हाधिकारी संजय दैने

**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्याने दिनांक १६ मार्च पासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी संजय दैने यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये जिल्ह्यात विविध बाबींवर निर्बंध लागू केले आहे. निर्बंध आदेश निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत अंमलात राहणार असून संबंधीत सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे

**शासकीय कार्यालय व विश्रामगृहे परिसरात सभा घेण्यास निर्बंध**

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय/ संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेण्यास मनाई करण्यात आली आहे. शासकीय आवारात राजकीय कामासाठी रॅली काढणे, निवडणूकी संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटींग्स, होर्डींग्ज लावणे, निवडणूक विषयक राजकीय घोषवाक्य लिहीणे, किंवा सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करण्यास निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे.

**सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरणास प्रतिबंध**

नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणूकीच्या कालावधीमध्ये होर्डीग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहीरात प्रदर्शीत करतांना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर ते दुर(नष्ट) करुन ईमारती, मालमत्ता पुर्ववत करुन घेणे, जाहिराती तात्काळ काढुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे निवडणूकीच्या कालावधीमध्ये शासकीय/निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपता करण्यास निर्बंध लावण्यात आले आहे.

**नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध**

राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी किंवा हितचिंतक यांनी तसेच मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापण्यास पुढील बाबीवर निर्बंध लावण्यात आले आहे. यानुसार इतर उमेदवाराचे नाव व त्यांना नेमुन देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मत पत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे व आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छपाईस निर्बंध आहे.

**धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध**

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर



कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध राहील .

**सार्वजनिक ठिकाणाजवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निर्बंध**

जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाचे जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध लावण्यात आले आहेत.

**जात धर्म भाषावार शिबिरांचे आयोजनास निर्बंध**

जिल्ह्यात कुठेही कसल्याही प्रकारचे जात/ भाषा/ धार्मिक शिबीरांचे /मेळाव्यांचे आयोजनावर निर्बंध राहील.

**मोटारगाड्या /वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध**

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दहापेक्षा अधिक मोटार गाड्या/वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास प्रतिबंध राहील.

**प्रचार वाहनावर कापडी फलक/ झेंडे लावण्यावर निर्बंध**

निवडणूक प्रचार मोहीमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे, इत्यादी बाबीसाठी बंधन राहील. यानुसार फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजुला विंडस्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासुन २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुने लावण्यात यावा, ईतर कोणत्याही बाजुस तो लावता येणार नाही. तसेच फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

**निवडणूक : नामनिर्देशन दाखल करतांना अवलंब करावयाची कार्यपध्दती**

निवडणूक कालावधीत गडचिरोली जिल्ह्यात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळेस वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या /वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. तसेच उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मीटर परिसरात तसेच दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक /सभाघेणे ,कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/ वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.उपरोक्त आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (दिनांक ०६.०६.२०२४) अंमलात राहतील. प्रत्येक ईसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीस विभागाने जाहीर करुन त्यास प्रसिध्दी करावी असेही जिल्हादंडाधिकारी यांचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .